**Limca**
**Book of Records**
***National Records***
**Edu. on Wheels, an initiative of**
**Sachin V. Joshi Caters to educational**
**Needs of slum Children.**

*Editor, Limca book of Records*

ज्ञानाचा प्रकाश
झोपड्यांत नेणारी
धन्य धन्य होशी
सचिन तू.
मंगेश पाडगांवकर
७-५-२००८

# सचिन उषा विलास जोशी

शिक्षण अभ्यासक

भारतीय समाजव्यवस्थेत आज आपण व्यक्तीच्या सर्वांगिण विकासाचा पाया म्हणून शिक्षणाकडे बघत असतो. म्हणूनच डॉ. ए.पी.जे अब्दुल कलाम म्हणायचे की, आपल्या भारताला सुपर पॉवर करायचे असेल तर तीन व्यक्तिवर अधिक मेहनत घ्यायची... **'विद्यार्थी, शिक्षक आणि पालक'**. हेच उद्याचा भारत घडविणारे मुलभूत घटक आहेत.

याच गोष्टीला नजरेसमोर ठेवून व याच ध्येयाने प्रेरीत होऊन सचिन जोशी यांनी शिक्षणक्षेत्रात काम करण्यास सुरुवात केली. शाळेत असतांना नेहमी Unit Test मधे नापास होणारे सचिन सर यांनी पुणे विद्यापीठाच्या विविध विषयात पोस्ट ग्रॅज्युएशन करुन ७ विविध डिग्रीज घेतल्यात पण एकही दिवस जॉब न करता त्यांनी सर्व प्रथम **'नापासांची शाळा'** काढली.

अतिशय कमी वयात त्यांनी नवनवीन संकल्पना शिक्षण क्षेत्रात रुजविल्या. जिथे शिक्षण पोहचू शकत नाही तिथे शिक्षण पोहचविण्यासाठी त्यांनी समाजकार्याच्या माध्यमातून त्यांनी भारतातील पहिली 'फिरती शाळा' बनविली. 'चाकं शिक्षणाची' या सामाजिक संस्थेचे ते संस्थापक, संचालक असून झोपडपट्टीमधील विद्यार्थ्यांसाठी फिरत्या शाळेच्या माध्यमातून 'Support Class" चालवतात.

त्यांनी **'शाळाबाह्य'** मुलांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी **'Every Child Count' Campaign** सुरु केले आहे. आतापर्यंत ८०० हून अधिक मुलांना त्यांनी शाळा मिळवून दिली असून **११० झोपडपट्टीमधील विदयार्थ्यांना त्यांनी दत्तक घेतले आहे. तसेच विटभट्टी वरील लहान मुलांसाठी सुध्दा ते वाचन शाळा चालवतात.**

तसेच बालमानसशास्त्र आधारीत शाळांवर ते कामे करतात. त्यांनी गांधी–आईनस्टाईन यांच्या शिक्षणतत्वांवर आधारीत 'इस्पॅलियर द एक्सप्रिमेंटल स्कूल ' या प्रयोगशील शाळेची स्थापना केली. या शाळेला श्री. शशी थरुर यांच्या हस्ते '**Most Innovative School** ' चा ॲवार्ड मिळविला आहे. तसेच **या प्रयोगशील शाळेला जागतिक स्तरावरील ''डिझाईन फॉर चेंज'' या संस्थेकडून ''आय कॅन ॲवार्ड'' बिलियर्ड्स वर्ल्ड चॅम्पियन गित सेठी आणि क्रिकेटर ईरफान पठाण यांच्या हस्ते मिळाला.**

विविध शाळांना ते Experimental Curriculum Design करुन देतात.

विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांसाठी ते विविध विषयांवर व्याख्याने, परिसंवाद आणि कार्यशाळा घेत असतात. नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी **'अभ्यास कौशल्य कार्यशाळा'** घेतात. आतापर्यंत ३ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांनी त्यांचे प्रेरणादायी व्याख्यान ऐकले आहेत.

तसेच पालकांसाठी संशोधनपूर्ण समुपदेशनपर व्याख्याने ते घेत असतात. **‘आई बाबांची कार्यशाळा’** **‘मुलांचा अभ्यास कसा घ्यावा?’** **‘टीव्हीचा मुलांवर होणारा परिणाम’** असे विविध विषयांवर ते व्याख्याने देतात.

**‘बालमेंदू कसा घडतो’** या विषयांवर त्यांनी सखोल संशोधन केले असून त्यांच्या संशोधनाचा डी.एड्च्या शिक्षक अभ्यासक्रमात समावेश करण्यात आला आहे. ‘बालमेंदू जडणघडण’ या विषयांवर ते सेमिनार देतात. शिक्षकांसाठीसुध्दा ‘शिक्षण म्हणजे काय?’ या विषयांवर ते चर्चासत्र भरवतात.

**ते शासनाच्या विविध शैक्षणिक समितीवर सुध्दा कार्यरत आहेत.**

त्यानी सहा वर्षाच्या आतील मुलामुलींसाठी शैक्षणिक खेळण्याची **किड्सविझ नावाची टॉय लायब्ररी** ही काढली आहे. बऱ्याच शहारात त्याच्या फ्रॅन्चायसीस देतात.

सचिन जोशी यांनी लिहिलेली विविध पुस्तकेही प्रकाशित झालेली आहेत. **‘मैत्री अभ्यासाशी’** हे त्यांचे प्रचंड खपाचे पुस्तक असून आतापर्यंत तेरा आवृत्ती आणि पाच लाखाहून अधिक पुस्तकांची विक्री झाली आहे. 'Friendship With Study' या नावाने या पुस्तकाचे इंग्रजीत अनुवाद झाले आहे.

तसेच ‘अ-अभ्यासाचा’ हे सुध्दा विद्यार्थ्यांसाठी पुस्तक लिहीले आहे. विद्यार्थ्यांना प्रेरीत करण्यासाठी ‘Sucess Stories’ या पुस्तकाचे संपादन त्यांनी केले आहे. तसेच विद्यार्थ्यांमध्ये संशोधनवृत्ती वाढावी म्हणून ‘शोध’या पुस्तकाचेही संपादन यांनी केले. ही दोन्ही पुस्तक लोकमत समुहाने प्रकाशित करुन दीड लाख प्रतींची विक्री झाली आहे.

शिक्षणक्षेत्रात प्रथमच अभ्यास व परीक्षेवर प्रेरणादायी गाणी आणि समुपदेशनपर ध्वनीफितची निर्मीती त्यांनी केली आहे.

लोकमत, सकाळ, दिव्य मराठी व महाराष्ट्र टाईम्स आणि विविध नियतकालीकांमध्ये त्यांचे शिक्षणावर विविध मार्गदर्शनपर लेख सातत्याने प्रकाशित होत असतात.

या सर्व कार्याची दखल घेवून सचिन जोशी यानी विविध मान्यवरांकडून आशीर्वाद, प्रोत्साहन व पुरस्कार प्राप्त झाले आहेत. यामध्ये माजी राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील, कवी मंगेश पाडगांवकर, प्राचार्य स्व. शिवाजीराव भोसले, पर्यावरणवादी सुंदरलाल बहुगुणा, जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते आण्णा हजारे, भारतीय मानसशास्त्राचे अभ्यासक भिष्मराज बाम, साहित्यिक आणि राजकारणी श्री. शशी थरुर, जागतिक विचारवंत श्री. संदीप वासलेकर, चाणक्य मंडळाचे अविनाश धर्माधिकारी, अंधश्रध्दा निर्मुलन समितीचे संस्थापक शाम मानव यांनी **‘सचिन उषा विलास जोशी’** यांच्या कार्याला गौरविले आहे. त्यांचे वैशिष्टे म्हणजे ते त्यांच्या नावात आईचे नाव सुध्दा लावतात.

आणि हा बदल त्यांच्या शाळेच्या विद्यार्थ्यांनी केला असून त्यांच्या शाळेत प्रत्येक विद्यार्थी असेच नाव लावतात. या सर्वांची दखल लिम्का बुकने घेवून त्यांची एनजीओ **‘एज्युकेशन ऑन व्हील’** ची नोंद **‘लिम्का बुक ऑफ रेकॉर्ड’** मध्ये झाली आणि महाराष्ट्रातील युवाशिक्षणतज्ज्ञ म्हणून त्यांना गौरविले आहे.